https://goo.gl/r4yVdJ

विद्यावार्ता

## Pay U Money

Online/Net Banking
Debit Card/Credit Card

PayU money

विद्यावार्ता

## PAYTM

Payment Accepted here

7588057695
9850203295

Paytm

विद्यावार्ता

## BHIM APP

Mobile Application
Online/Net Banking

BHIM

विद्यावार्ता

## SBI BUDDY

9850203295

Buddy

**Edit By**

Dr. Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath, Dist.Beed 431 515
(Maharashtra, India)
Cell : +91 75 88 05 76 95

**Publisher & Owner**

Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

ISSN 2394-5303

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

The Berar General Education Society's


# SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOLA

*(NAAC Reaccredited "A" grade)*

University Grants Commission, Sponsored
One Day National Conference
*On 30 January 2018*

# Economical Study of Regional Disparity in India

Special issue of an International
**SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES**
**IMPACT FACTOR SJIF (2016)-6.177**
ISSN : 2[illegible] – 4766 (P), ISSN : 2278-8808 (E)



**Editor**
**Dr. Prasannajit R. Gawai**

**VOL-3**

# INDEX



| Sr. No | Title of Article & Author (S) Name | Page No. |
| --- | --- | --- |
| 127 | छोटे राज्य बनाम आर्थिक विकास<br>*डॉ. प्रकाश पगारे* | 463-467 |
| 128 | आर्थिक सुधार पश्चात भारत में क्षेत्रीय असामानता<br>*डॉ. संगीता झा* | 468-472 |
| 129 | क्षेत्रीय असमानता :भारत में आर्थिक और भौगोलिक प्रभाव<br>*डॉ. श्रीमती आर. के. मरावी* | 473-474 |
| 130 | भारत की साक्षरता की प्रादेशिक विषमताएँ<br>*डॉ. रमेश कुमार पाण्डेय & रश्मि पाण्डेय* | 475-477 |
| 131 | **Dr. Babasaheb Ambedkar's view on small states and vidarbha's demand**<br>*Dr. Prasannajit Gawai* | 478-480 |
| 132 | हिंदी उपन्यास : आर्थिक पहलू के परिप्रेक्ष्य में आदिवासी जीवन<br>*प्रा. डॉ. सुरेशकुमार केसवाणी* | 481-483 |
| 133 | भारत में क्षेत्रीय असमानता<br>*प्रा. डॉ. विनोद कुमार कोमा & श्री. ईश्वर लाल खेर* | 848-484 |
| 134 | भारत में प्रादेशिक असंतुलन<br>*प्रा. डॉ. रमेश प्रभाकर जोशी* | 485-489 |
| 135 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर इनके ग्रामीण एवं शहरीकरण के संदर्भ में पारंपरिक एवं आधुनिक विचार<br>*प्रा. धीरज आर. भाला* | 490-491 |
| 136 | प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात वेगळ्या विदर्भाची चळवळ<br>*प्रा. डॉ. रतन व्ही. राठोड* | 492-496 |
| 137 | भारतातील सिंचीत क्षेत्राचा असमतोल<br>*प्रा. बालाजी किशनराव शिंदे* | 497-501 |
| 138 | भारतातील वेगवेगळया प्रादेशिक सार्वजनिक ग्रंथालय अधिनियमातील तरतूदी<br>*डॉ. अशोक शंकरराव सोनोने* | 502-504 |
| 139 | महाराष्ट्रात आदिवासींच्या आर्थिक विकासाची गरज का?<br>*प्रा. इंद्रजित एम. राजपूत* | 505-507 |
| 140 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे स्वरूप व समस्यांचे अध्ययन<br>*प्रा. डॉ. महादेव आसाराम रिठे* | 508-510 |
| 141 | भारतातील प्रादेशिक विषमता<br>*प्रा. लालचंद एन. मेश्राम* | 511-512 |
| 142 | बलुतेदारांच्या स्थितीचे वर्णन करणारी आत्मचरित्रात्मक कांदबरी–'फिरल्या चाकावरती'<br>*प्रा. भास्कर भि. धारणे* | 513-514 |

| | | |
|---|---|---|
| 143 | स्वतंत्र विदर्भ राज्य चळवळीचा ऐतिहासिक आढावा<br>*प्रा. संतोष गो. कुळकर्णी* | 515-517 |
| 144 | मराठीच्या बोली : एक प्रादेशिक समन्वय<br>*डॉ. हरिदास देवीदास आखरे* | 518-519 |
| 145 | महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा सामाजिक असमतोल<br>*प्रा. दिलीप दामू कुमरे* | 520-521 |
| 146 | महाराष्ट्रातील लोकसंगीताचा प्रादेशिक विकास<br>*प्रा. नाना व्ही. भडके* | 522-524 |
| 147 | ग्रामीण अर्थव्यवस्था, व तिच्या भारतातील भूमिका<br>*प्रा. पुरूषोत्तम बांडे* | 525-526 |
| 148 | लहान घटक राज्यांच्या संदर्भात भाषेतील क्षेत्रीय असमानता<br>*प्रा. हरिचंद्र नागसू नरेटी* | 527-528 |
| 149 | क्षेत्रीय विषमतेमुळे होणाऱ्या विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे अध्ययन<br>*प्रा. सुनिल प्रल्हाद गायगोळ* | 529-534 |
| 150 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. डॉ. प्रदिप वि. ताकतोडे* | 535-536 |
| 151 | स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचा अस्तित्व बोध<br>*प्रा. डॉ. बी. एस. वझिरे* | 537-539 |
| 152 | वैदर्भिय अर्थकारण —एक अभ्यास<br>*प्रा. डॉ. निलिमा दिगांबर कापसे* | 540-541 |
| 153 | महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल<br>*प्रा. डॉ. वसंत नानाराव पतांगे* | 542-545 |
| 154 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लहान राज्याविषयीचा दृष्टीकोण<br>*डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड* | 546-548 |
| 155 | स्वतंत्र विदर्भ राज्य : महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा आढावा<br>*प्रा. डॉ. धर्यवर्धन ह. पुंडकर & प्रा. दिलीप ह. सूर्यवंशी* | 549-550 |
| 156 | वैदर्भीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय<br>*प्रा. डॉ. दिनकर उंबरकर* | 551-554 |
| 157 | डॉ. बाबासाहेंब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिका<br>*प्रा. डॉ. ममता इंगोले महल्ले* | 555-559 |
| 158 | डॉ. आंबेडकरांचे केंद्र व छोटया राज्याचे सार्वजनिक आय—व्यय संबंधी विचार<br>*प्रा. डॉ. ममता आर. साहू* | 560-561 |
| 159 | महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक असमतोलाचे अध्ययन<br>*प्रा. डॉ. संतोष उ. धामने* | 562-563 |
| 160 | विदर्भ राज्याची मागणीची कारणमीमांसा<br>*प्रा. डॉ. सुरेश पंडीत* | 564-565 |
| 161 | रियाजाचे महत्व<br>*प्रा. डॉ. पी. आर. सुपळकर* | 566-567 |
| 162 | औद्योगिक क्षेत्रातील असंघटीत कामगारांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन<br>*प्रा. योगेश कराळे* | 568-569 |
| 163 | महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल निर्माण होण्याची कारणे<br>*प्रा. प्रतिभा येवले (म्हातारमारे) & प्रा. शितल ताथोड (ठाकरे)* | 570-571 |

157.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिका

प्रा. डॉ.ममता इंगोले (महल्ले)
सहयोगी प्राध्यापक,तथा भाषाविभाग प्रमुख, डॉ.एन.एन.सिन्हा महाविद्यालय,पातूर,जि. अकोला

**" India is a Union of States, an indestructible Union of destructible States** भारत हा राज्यांचा संघ आहे, विघटीत होऊ न शकणा–या राज्यांचा न मोडता येणारा संघ आहे. संविधानाच्या कलम ३ नुसार नव्या राज्यांच्या निर्मितीबाबत, अस्तित्वात असलेल्या राज्यांच्या सीमा बदलविण्याबाबत, सीमा नष्ट करण्याबाबतचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे.''१

त्यामुळेच अलिकडे नव्या लहान–लहान राज्यांच्या मागण्या पुन्हा जोर धरू लागल्या. आंध्रात 'तेलंगणा' निर्मितीमुळे देशातील अन्य भागातून वेगवेगळया राज्यांच्या निर्मितीची मागणी नव्याने जोर धरू लागली आहे. मध्य प्रदेशात 'स्वतंत्र विंध्य प्रदेश', पश्चिम महाराष्ट्रात 'विदर्भ', ओरिसा मधून स्वतंत्र कोशल राज्य, पश्चिम बंगाल मधील 'गोरखालॅंड', उत्तर प्रदेशाला स्वतंत्र राज्याचा दर्जा देऊन 'हरित प्रदेश', आसाम मध्ये 'बोडोलॅंड', या नव्या राज्याची मागणी वाढतच आहे. विशेषत: गेल्या दोन दशकात एकपक्षीय प्रभूत्व पध्दतीनंतर आघाडी सरकारचे युग सुरू झाल्यामुळे प्रादेशिक अस्मिता, प्रादेशिक पक्षाचा प्रभावाला महत्व प्राप्त होऊ लागल्यामुळे व केंद्र सरकारच्या निर्मितीत वाढते महत्व व सहभागामूळे नव्या राज्यांच्या मागणीचे राजकारण करण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याचे दिसून येते. लहान व मोठया राज्यांमध्ये आकाराच्या दृष्टीने पहाता फार मोठया प्रमाणात असमानता दिसून **येते.** म्हणूनच मोठया राज्यांतील विकासात प्रादेशिक असमतोल निर्माण होतो. कारण मोठया राज्यांतील प्रभावी राजकीय नेतृत्व आपापल्या प्रादेशिक विकासावर अधिक भर देते. व अन्य प्रदेशांकडे दुर्लक्ष केले जाते. उदा. महाराष्ट्रातच पश्चिम महाराष्ट्र,विदर्भ,मराठवाडा, कोकण,या विकासाच्या अनुशेषावरून वेळोवेळी असंतोष प्रकट होतांना दिसतो. त्याचे कारण विकासातील प्रादेशिक असमतोलच आहे. हे नाकारून चालणार नाही. आर्थिक वाटप, औद्योगिक विकास, रोजगार मिळविण्याच्या संधी या कारणांमुळे विषमता वाढून त्या प्रदेशातील लोकांमध्ये वेगळेपणाची व उपेक्षा केल्याची भावना वाढीस लागते. व त्यांचे पर्यवसान स्वतंत्र राज्यांच्या मागणीत होऊ लागल्याचे सर्वत्र दिसून येत आहे यातूनच लहान राज्यांच्या मागण्यांनी जोर धरला आहे.

नव्या लहान राज्यांच्या निर्मितीमुळे प्रशासन व्यवस्था चांगली राहते, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाला गती प्राप्त होते. कायदा व सुव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे सोपे जाते. जनतेच्या भावनांचे, आशा–आकांक्षा प्रतिबिंब सरकारमध्ये पडते. या मुद्यांच्या आधारावर नव्या राज्यांची मागणी केली जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राज्याच्या पुनर्रचनेसाठी 'जे. व्ही. पी. आयोग' 'दार समिती' व राज्य पुनर्रचना आयोग १९५३' नेमण्यात आले होते. भाषावार प्रांतरचनेला राज्य पुनर्रचना आयोगाने विरोध केला होता. या आयोगाच्या शिफारसीनुसार तत्कालीन २८ राज्यांपैकी १६ राज्यांची व्यवस्था करण्यात आली व ३ केंद्रशासित प्रदेश करण्यात यावयाचे होते परंतू त्यात बदल करून १४ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश करण्यात आले. परंतू राज्याच्या पुनर्रचनेसाठी ते आधारभूत तत्व निश्चीत करण्यात आले त्यामुळे प्रादेशिक असंतुलन तसेच विभिन्न अस्मिता व उप–संस्कृती यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. मुख्यत: स्वायत्तता व असंतुलनाच्या मोठया प्रमाणात प्रादेशिक आंदोलन होऊन नव्या राज्यांची निर्मिती करण्यास केद्र शासनावर दडपण येऊन आजपर्यंत एकुण २८ राज्यांची निर्मिती करावी लागलेली आहे. भाषावार प्रांतरचना करूनही अन्य कारणांनी नवीन राज्ये निर्माण करावी लागली तरी अनेक प्रदेशातून नव्या राज्यांच्या मागण्या होतच आहेत. वास्तविक पाहता १९५६ च्या राज्यपुनर्रचनेच्या धोरणातच त्यांचे मूळ होते. प्रादेशिक असंतुलन व विषमता या कारणांमुळे नव्या राज्याच्या मागण्या जोर धरू लागल्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रशासकीय व्यवस्था लक्षात घेऊन राज्यांची पुनर्रचना करण्याकडे दुर्लक्ष झाले. 'राज्य पुनर्रचना आयोग १९५६' च्या शिफारशींची पुर्णपणे अंमलबजावणी करण्यात आली नाही. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात

देशात राज्याची पुनर्रचना अनेकदा झाली. तेव्हा कधी भाषा,लोकसंख्या,क्षेत्रफळ तर कधी सुरक्षितता अशा वेगवेगळ्या निकषांनुसार निर्णय घेतले गेले.जी राज्ये निर्माण करण्यात आलीत त्या राज्यांतील अंतर्गत संपर्काची – अंतराची म असल्यामुळे ती एकजीनसी बनू शकत **नव्हती** त्यांच्या अस्मिता आणि परंपरा यात वेगळेपण होते. याच कारणांमुळे अ राज्यांच्या राजधान्यांबद्दल त्या प्रांतातील जनतेचे मानसिक ऐक्य व आत्मीयता निर्माण होऊ शकली नाही. आर्थि मागासलेपणा आणि वाढत्या विकासाच्या आकांक्षांच्या उत्पत्तीतूनच लहान राज्यांची मागणी होत आहे. विस्तार आ लोकसंख्याबाढीच्या दृष्टीने मोठया राज्यांतच क्षेत्रीय असंतुलन सर्वाधीक आहे. उदा. जोपर्यंत हरीयाणाचा भाग पंजा प्रांताचा होता तेव्हा त्या भागाचा विकास कुंठीत होता. पंजाबपासून जेव्हा तो स्वतंत्र अलग प्रदेश झाला तेव्हापासू त्याच्या आर्थिक विकासाला गती प्राप्त झाली. हे लक्षात घेऊनच अशा प्रकारची भावना लदद्राख आणि उत्तराखंडची हो बसली. त्यांची अशी समजूत आहे की आपण अलग झाल्याशिवाय आपले भविष्य उज्वल नाही. लहान राज्यांच्या मागणीच्या इतिहासाकडे पाहू जाता **डॉ. बाबासाहेंब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिकेचा** परामर्श घेणे अध्ययनाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

**२)पध्दतीशास्त्र –** सामाजिक न्याय, प्रशासकीय सोय आणि समतोल विकास यासाठी घटक राज्यांची निर्मिती केली लहान राज्यांच्या निर्मितीमुळे प्रशासन व्यवस्था चांगली राहते, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाला गती प्राप्त होते कायदा व सुव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे सोपे जाते. जनतेच्या भावनांचे, आशा–आकांक्षा प्रतिबिंब सरकारमध्ये पडते. या मुद्यांच्या आधारावर नव्या राज्यांची मागणी केली जात आहे.या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनाकरीता संशोधकाने 'डॉ. बाबासाहेंब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिका' हा विषय निवडला आहे.'डॉ. बाबासाहेंब आंबेडकर', आणि 'डॉ. बाबासाहेंब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिका' या व्दिसूत्रातून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**३)गृहीतकृत्ये–**

१)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक न्यायविचार संविधानातून पदोपदी जाणवतात.

२)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लहान राज्ये निर्माण करावीत भूमिका सडेतोडपणे मांडली आहे.

३)डॉ. बाबासाहेंब आंबेडकराच्या विचारांची अंमलबजावणी करून लहान आणि मोठया राज्यांचा विकासाचे समतोल संतुलन राखण्यासंबंधीची दिशा मिळते.

४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लहान आणि मोठया राज्यविषयकविचारांवर अंमल केल्यास देश एकसंघ राहिल आणि त्यामुळे राष्ट्राचा विकास चांगला होईल.

**४)संशोधनाचा उद्देश –** सध्या अस्तित्वात असलेली मोठी राज्ये लोकशाहीच्या आधारभूत आणि मान्य सिद्धान्तांना नाकारून केवळ राजकीय प्रभूत्व टिकवण्यासाठी निर्माण केली असल्यामुळे या प्रजेचे राज्य नसून नेत्याचे राज्य आहे. लोकशाहीत प्रजेच्या कल्याणाची कार्ये आणि हितांचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी ही मोठी राज्ये पार पाडण्यास असमर्थ ठरलीत अशावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लहान आणि मोठया राज्यविषयकविषयक विचार जनजागृतीसाठी प्रेरक ठरतात.या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी दिलेला राज्यकारभार, प्रशासन आणि प्रादेशिक समतोल विकास यासाठी लहान राज्ये जनतेच्या हिताची असतात हा विचार महत्वाचा ठरतो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे अनमोल विचार जाणून घेणे हा या संशोधना मागचा उद्देश आहे.

**५)संशोधन –**

**५– अ) 'डॉ. बाबासाहेंब आंबेडकर'–** भारताच्या राजकीय आणि सामाजिक आणि धार्मिक इतिहासात डॉ.बाबसाहेब आंबेडकरांची कामगिरी चिरंतन ठरणारी आहे. कोटयवधी दलित, बहुजन आणि स्त्रियांच्या जीवनात क्रांती करून त्यांनी भारताच्या सामाजिक विचारात आणि तत्वज्ञानात मोलाची भर घातली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'प्रचंड धैर्य आणि विशाल बुद्धी' हे भारतीय समाजाला आदर्शभूत ठरेल. अन्यायाने आणि विषमतेने गांजलेल्या कोटयवधी भारतीय जनतेच्या

जीवनात परिवर्तन घडावे, त्यांना मानवी हक्क व समतेची वागणूक मिळावी म्हणून बाबासाहेबांनी आयुष्यभर लढा दिला. न्याय, समता आणि एक्य यांच्या पायावर भारतीय जनता संघटीत झाल्यापासुन या देशातील परकीय सत्ता नष्ट होणार नाही आणि देशाला स्वातंत्र मिळणार नाही असा त्यांचा विश्वास होता.

प्रखर बुध्दिचातुर्य, प्रगाढ विद्याव्यासंग, उदंड आत्मविश्वास, स्वमत प्रतिपादनाची रोखठोक शैली, दीर्घ व्यासंग, विषयाचे सार्वगामित्व आणि नवीन वैज्ञानिक दृष्टिकोन, अखंड निर्भयता, देशकल्याणाची तळमळ या गुणांनी युक्त बाबासाहेबांनी मानव जातीला समता, दया,शांतीचा संदेश दिला. त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू हि–याप्रमाणे आहे. त्यांचे व्यक्तिजीवन अनेक पैलूंनी सुशोभित झालेले आहे. भारतीय राज्यघटनेचा शिल्पकार, धर्मातील ढोंगबाजीवर आपल्या प्रखर वाणीने प्रहार करणारा थोर मूर्तिभंजक, सत्याचा वारकरी, अस्पृश्यांची मने फुलविणारा घननीळा, दलितांचा कैवारी,थोर अर्थशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय कीर्तीचा गाढा विव्दान, निष्ठावंत समाजसेवक,निर्भयतेचा मेरुमणी, मानवतेचा महान उपासक, अस्पृश्यांचा भाग्यविधाता, स्त्रियांचा कैवारी अशा अनेक पैलूंनी डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्व समजलेले आहे.'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिकेचा' परामर्श यापुढे घेतला आहे

**५– ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लहान राज्यविषयक भूमिका** – भाषावार प्रांत रचनेच्या प्रश्नांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दोन पुस्तके प्रकाशित आहे. पहिले १९४८ मध्ये 'मराठी भाषकांचा महाराष्ट्र' हे पुस्तक म्हणजे भाषावार प्रांत कमिशनकडे सादर केलेले निवेदन आहे व डिसेंबर १९५५ मध्ये ' जीवनहीजे वद स्पदहनपेजपब ैजंजम व्दारा नव्याने मांडणी केलेली आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते एकभाषा बोलणा–यांची जर विविध प्रांतात विभागणी केली तर त्यांच्यात प्रांतित व भाषिक अशी एक भावना निर्माण होणार नाही. परिणामी त्यामुळे राष्ट्राचा विकास चांगला होऊ शकतो. शिवाय जी मोठी राज्ये पुनर्रचना आयोगाव्दारा निर्माण केला आहेत. त्या राज्यांचीही लहान राज्यात निर्मिती करावी म्हणजे प्रशासकिय कामे सोपी होतील. शिवाय त्यांच्या मनामध्ये राष्ट्रांच्या एकात्मतेची भावना अधिक निर्माण झाल्यामुळे ती लहान राज्ये केंद्र सरकारला आव्हान देऊ शकणार नाहीत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लहान राज्ये निर्माण करावीत अशी सूचना राज्य पुनर्रचना आयोगास केली होती. डॉ. आंबेडकरांनी भाषावार प्रांतीत रचनेबाबत अशी मागणी केली की, भारतात सामाजिक आणि राजकिय समानता निर्माण करण्यासाठी बैमबो – ठसंदबमे ची गरज आहे. त्यांना अशी भिती वाटत होती की, नविन भाषावार प्रांतीत रचनेत प्रगत जातीचे प्राबल्य जास्त असणार आहे व त्यांच्याकडेच राज्याच्या सत्तेचे केंद्रीकरण होणार आहे. त्यांनी मोठया राज्यांची संकल्पना मोडीत काढली व लहान राज्ये निर्माण करण्यासाठी सूचना दिल्या. त्यामुळे अल्पसंख्याक,दलित,आदिवासी व उच्चवर्णीय यांचे समान विभाजन होऊन राज्ये निर्माण झाले पाहिजेत, ही त्यामागची त्यांची भूमिका होती. मोठया राज्यांपेक्षा छोटया राज्यात अल्पसंख्याक अधिक सुरक्षित राहतील हे दार आयोगापुढील डॉ. आंबेडकरांचे मत कायम होते. याच आधारावर मे १९५४ मध्ये भंडारा जिल्हयातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवितांना विदर्भाचे वेगळे राज्य झाल्यास त्याला पाठिंबा राहिल असे त्यांनी जाहिर केले होते.

राज्यकारभार, प्रशासन आणि प्रादेशिक समतोलविकास यासाठी लहान राज्ये जनतेच्या हिताची असतात अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. ''छोटया राज्यांची संकल्पना मांडतांना डॉ. आंबेडकरांनी केवळ महाराष्ट्रापुरताच विचार केला नव्हता. प्रशासनाच्या दृष्टीने आणि लोकशाहीच्या जोपासनेसाठी संपूर्ण भारतातील सर्व राज्यांचा आकार आटोपशीर असावा असे त्यांचे मत स्पष्ट होते. त्यामुळेच महाराष्ट्राबरोबरच उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेश या मोठया राज्यांचे विभाजन करून लहान–लहान राज्ये करावीत असे त्यांचे मत होते. या लहान –लहान राज्यांचा भौगोलिक सीमा देखील निर्धारीत करताना त्यांनी उत्तर प्रदेशाचे पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य उत्तर प्रदेश आणि पूर्व उत्तर प्रदेश अशा तीन राज्यांत विभाजन करावे आणि क्रमशः मीरत, कानपूर आणि अलाहाबाद या ठिकाणी त्यांची राजधानी ठेवावी असा विचार मांडला. बिहारचे विभाजन उत्तर बिहार आणि दक्षिण बिहार अशा दोन राज्यात करावे आणि मध्यप्रदेशाचे विभाजन उत्तर मध्यप्रदेश आणि दक्षिण मध्यप्रदेश अशा दोन राज्यांत करावे असे स्पष्ट मत व्यक्त केले.

महाराष्ट्राच्या चार राज्यात विभाजनासंबंधी त्यांनी समर्थनार्थ कारणे दिलीत ती अशी.

(१) विशाल महाराष्ट्रामुळे सरकारच्या राज्यकारभार करण्याचा क्षमतेवर मर्यादा येतील व लोकांच्या समस्या तातडीने सोडविता न आल्यामुळे लोकांमध्ये असंतोष निर्माण आंदोलने होऊ शकतील.

(२) मराठी भाषिकांचे चार राज्य झाल्यास एकाऐवजी चार मुख्यमंत्री मराठी भाषिकांचे प्रतिनीधीत्व करून केंद्रशासनावर अधिक प्रभाव टाकू शकतील व मराठी भाषिक राज्ये शक्तीशाली बनतील.

(३) मराठी भाषिकांचे एकच राज्य झाल्यास एका विशिष्ट जातीच्या लोकांचे प्रमाण अधिक होउन त्यांच्या हाती राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होईल.

(४) महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागात आर्थिक विषमता आहे. मराठवाडा, कोकण व विदर्भ हे विकासाच्या दृष्टीने मागासलेले आहेत. मोठया राज्यात त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष होणार नाही ाची हमी देता येत नाही म्हणून त्यांच्या विकासाची त्यांना स्वतंत्रपणे संधी देण्यासाठी स्वतंत्र राज्याचा दर्जा देणे हा अधिक चांगला पर्याय आहे.

(५) पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिकदृष्टया अधिक विकसित असल्यामुळे विदर्भ व मराठवाडा या मागास भागांच्या औद्योगिक विकासाकडे एकीकृत महाराष्ट्रात काळजी घेतली जाईल याबाबत खात्री देता येत नाही.

(६) ऐतिहासिकदृष्टया हे स्पष्ट आहे की प्राचीन काळापासूनच महाराष्ट्राचे तीन विभाग होते. त्यावरूनहे स्पष्ट होते की परंपरा, जीवनशैली, सामाजिक परिस्थिती आणि आर्थिक परिस्थिती याबाबत तीनही राज्यात साम्य नाही. वेगळेपण आहे.

(७) पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ यात शैक्षणिक विषमता मोठया प्रमाणात आहे. याच कारणामुळे त्यांनी मराठवाडयाबद्दल विशेष चिंता व्यक्त केली होती. कारण निझामाने विकासाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले होते. म्हणून असा सल्ला मराठवाडयातील लोकांना दिला की त्यांनी स्वतंत्र वेगळे राज्य केल्यास त्यांचा विकास होईल.

अशाच प्रकारची परिस्थिती उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश, बिहार या राज्यात असल्यामुळे यांचे विभाजन करून लहान–लहान राज्ये निर्माण करण्याची डॉ. आंबेडकरांची आग्रही भूमिका होती.**'एक भाषा एक राज्य'** हा राज्यनिर्मितीचा नियम असंबदध आहे आणि तर्कशून्य आहे. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी या निकषाला विरोध दाखविला व लहान राज्याची भूमिका विशद करताना निसंदीग्धपणे जाहीर केले की **'एक भाषा एक राज्य'** या सूत्राचा त्याग करून **'एक राज्य एक भाषा '** या सूत्राचा विचार करावा.''३

लोकशाही योग्य पध्दतीने कार्यान्वित करावयाची असेल तर प्रजेची विभागणी करून भौगोलिक सिमा अश्या प्रकारे निर्धारीत कराव्यात की ज्यामुळे एका प्रदेशातील राज्य हे स्वतंत्र असा एकात्म समुह मानून ओळखता येईल. पण भाषिक एकात्मता हा निकष योग्य नाही. **भाषा** प्रजेचा एकात्म समुह निर्माण करीत नाही. एकात्मता ही इतर असंख्य घटकांवर अवलंबून असते. आणि राज्याची निर्मिती करताना या इतर घटकांकडे दुर्लक्ष करून चालनार नाही.

**समारोप :–**

मोठी राज्येच कार्यक्षम व स्वयंपूर्ण असतात आणि लहान राज्यांना विकासाच्या स्पर्धेत उतरताही येत नाही हा आपल्या राजकारणाने पोसलेला आजवरचा भ्रम कायमचा निकालात निघावा असा हा अनुभव आहे. पंजाब, हरियाण यासारखी लहान राज्ये विकासाच्या स्पर्धेत पुर्वीही पुढे होती आजही पुढे आहे. पण त्याचबरोबर नव्याने निर्माण झालेली उत्तराखंड,छत्तीगड आणि झारखंडयांनी गाठलेली उंची यामुळे लहान राज्ये आपला विकास सक्षमपणे करु शकत नाही असे म्हणता येत नाही. उत्तराखंड,छत्तीगड आणि झारखंड नव्या लहान राज्यांनीही विकासाचा फार मोठा वेग घेतल्याचे देशाच्या आर्थिक सर्वेक्षणात आढळून आले आहे. आदिवासींची ही लहान राज्ये याच काळात मोठया राज्यांनी गाठलेला ७ टक्के विकासाचा दर गाठू शकली आहेत. लहान राज्यांच्या वाढलेल्या विकास दरामुळेच राष्ट्रीय उत्पन्नाचा वाढीव दर देशात गाठता आला आहे. देशातील सर्वाधिक मागासलेले व सर्वाधिक अशांत म्हणून ओळखले जाणा–या राज्यांनी विकासाच्या क्षेत्रात उंची गाठली हे राज्य विकासाच्या क्षेत्रात एवढी उंची गाठू शकण्याचे कारण त्यांच्या सध्याच्या चांगल्या प्रशासनात व नेतृत्वात शोधावे लागणार आहे. नव्याने निर्माण झालेल्या तेलंगणा राज्याची सुध्दा विकासाच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. त्यामुळे राज्यकारभार, प्रशासन आणि प्रादेशिक समतोल विकास यासाठी लहान राज्ये जनतेच्या हिताची असतात हे सिध्द होते. डॉ. आंबेडकरांनी लहान राज्यांच्या मागणीचे समर्थन करतांना म्हटले आहे की, देश एकसंघ राहिल आणि त्यामुळे

राष्ट्राचा विकास चांगला होईल याच निकषावर जागतिकीकरणाच्या प्रकियेत स्वतंत्र विदर्भाची मागणीही न्याय ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वैदर्भिय जनतेने वेगळया विदर्भाची मागणी करणेच त्यांच्या हिताचे राहिल असा इशारा दिला होता. लहान राज्य निर्मिती म्हणजे देश विभाजन नाही. ती भारत व राज्यांच्या मुलभूत स्वरूपाचे यथार्थ भान ठेवून केलेली मागणी आहे. ही मागणी पुनर्रचनावादी आहे, विधायक आहे. याबाबतचे गैरसमज जेवढया वेगाने दूर होतील तेवढीच विधायक पुनर्रचनेला गती मिळेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लहान आणि मोठया राज्यविषयक विचारांवर अंमल केल्यास देश एकसंघ राहिल आणि त्यामुळे राष्ट्राचा विकास चांगला होईल.

**निष्कर्षः—**

१)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक न्यायविचार संविधानातून पदोपदी जाणवतात.

२)डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लहान राज्ये निर्माण करावीत भूमिका सडेतोडपणे मांडली आहे.

३)लहान राज्य निर्मिती म्हणजे देश विभाजन नाही. ती भारत व राज्यांच्या मुलभूत स्वरूपाचे यथार्थ भान ठेवून केलेली मागणी आहे.

४)डॉ.बाबासाहेंब आंबेडकराच्या विचारांची अंमलबजावणी करून लहान आणि मोठया राज्यांचा विकासाचे समतोल संतुलन राखण्यासंबंधीची दिशा मिळते.

५)लहान राज्ये आपला विकास सक्षमपणे करु शकत नाही असा राजकिय अपसमज आहे.

६)राज्यकारभार, प्रशासन आणि प्रादेशिक समतोल विकास यासाठी लहान राज्ये जनतेच्या हिताची असतात

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लहान आणि मोठया राज्यविषयकविचारांवर अंमल केल्यास देश एकसंघ राहिल आणि त्यामुळे राष्ट्राचा विकास चांगला होईल.

*संदर्भ* :—१) —डॉ. मोहन दिवान,प्रा. जयंत देवधर, प्रा. विवके दिवान, 'भारतातील राज्याचे राजकारण', विद्या प्रकाशन,नागपूर, प्रथमावृत्ती २००४,पृष्ठ. क्र.२०८

२)— डॉ. मोहन दिवान,प्रा. जयंत देवधर, प्रा. विवके दिवान, 'भारतातील राज्याचे राजकारण', विद्या प्रकाशन,नागपूर, प्रथमावृत्ती २००४,पृष्ठ. क्र.२०३

३)— डॉ. मोहन दिवान,प्रा. जयंत देवधर, प्रा. विवके दिवान, 'भारतातील राज्याचे राजकारण', विद्या प्रकाशन,नागपूरनन, प्रथमावृत्ती २००४,पृष्ठ. क्र.२०३,२०४

*संदर्भ सूची* —

१) — डॉ. मोहन दिवान,प्रा. जयंत देवधर, प्रा. विवके दिवान, 'भारतातील राज्याचे राजकारण', विद्या प्रकाशन,नागपूर, प्रथमावृत्ती २००४,

२) — भोळे भा.ल. 'भारतीय राज्यव्यवस्था,' नागपूर.

३) — मोहन सुरेंन्द्र समाजवाद, 'धर्म निरपेक्षता आणि सामाजिक न्याय', नई दिल्ली

४) — बेकिहाल, किशोर परिवतन वसंत पळशीकर यांचे निवडक लेख, मुंबई

५) — कांबळे पद्याकर राज्यनिर्मिती आणि आंबेडकर, लोकसत्ता, ९ ऑगस्ट २००९

६) — खांदेवाले श्रीनिवास छोटया राज्यांची मागणी टाळता येईल काय? लोकमत १ जाने २०१०

७) — पाठक सुधीर तेलंगणा होणार भारत, १३ डिसेंबर, २०१०

८) — प्रबोधन प्रकाशन ज्योती डिसेंबर २०१२

९) — प्रबोधन प्रकाशन ज्योती डिसेंबर २०१४